विनोद टिकले ओबीसी समिती राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी

नागपूर : ओबीसी समितीच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी विनोद टिकले यांची निवड करण्यात आली आहे. समितीची केंद्रीय कार्यकारिणी व निमंत्रित संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची नवी दिल्ली येथे नुकतीच सभा घेण्यात आली. यावेळी समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष धर्मराज पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सभेत विनोद टिकले यांची राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यांच्या नावाला समितीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नानाभाऊ उमाठे, छत्तीसगडचे प्रदेश अध्यक्ष देवप्रसाद साहू, दिल्लीचे प्रदेश अध्यक्ष गंगाराम तंवर यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी अनुमोदन केले. विनोद टिकले ओबीसी आरक्षण संघर्ष समिती महाराष्ट्र प्रदेशचे कार्याध्यक्ष श्रीराम स्वामी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, प्रगती हाऊसिंग सोसायटी लि. चे सचिव, गोविंद अर्बन बँकेचे मानद सचिव, श्री क्षेत्र रामटेक धर्मशाळेचे कोषाध्यक्ष आदी संस्था संघटनेच्या पदावर ते कार्यरत आहेत. या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

महानगर पालिका अधिकाऱ्यांच्या

दिमतीला इलेक्ट्रिक वाहने

पेट्रोल, डिझेलवरील वाहने बंद

कंत्राटी वाहन चालकांचे आंदोलन

◆ **नागपूर, २ नोव्हेंबर**

राज्य शासनाने १ एप्रिलपासून इलेक्ट्रिक वाहनाचा वापर करावा, असे निर्देश दिले होते. त्यानुसार मनपाने अधिकारी-पदाधिकाऱ्यांच्या दिमतीला असलेली पेट्रोल-डिझेलवरील वाहने बंद करून इलेक्ट्रिकवरील वाहनाचा वापर करणार आहे. त्यामुळे कंत्राटीवर असलेल्या शेकडो वाहन चालकांवर बेरोजगारीचे संकट कोसळणार आहे. याविरोधात आज वाहन चालकांनी मनपाच्या हिरवळीवर निदर्शने केली.

मनपात अधिकारी-पदाधिकाऱ्यांच्या दिमतीला १९९९ पासून भाडेतत्त्वावर खाजगी वाहने वापरली जात होती. मात्र, राज्य शासनाच्या निर्देशानुसार पेट्रोल,

डिझेल आणि सीएनजीवरील वाहने बंद करून इलेक्ट्रिक वाहनांची निविदा काढली. या निविदेचे दरपत्रक अद्याप उघडलेले नाही. परंतु, इलेक्ट्रिक वाहनांसाठी ५६७०० रुपये दरमहा मनपाला मोजावे लागणार आहेत.

यापूर्वी पेट्रोल, डिझेल वाहनांसाठी मनपा दरमहा ३० हजार रुपये प्रतिमहा दिले जात होते. अर्थात आता मनपाला दुप्पट रक्कम मोजावी लागणार आहे. हा जनतेच्या कराचा अपव्यय आहे. मनपाने एका खाजगी कंपनीला इलेक्ट्रिक वाहनांचे कंत्राट दिले आहे. त्यामुळे यापूर्वीच्या वाहन चालकांवर उपासमारीचे संकट ओढवणार आहे. यासंदर्भात वाहन चालकांनी मनपा आयुक्त तथा प्रशासक राधाकृष्णन बी. यांना निवेदन दिले असून, पेट्रोल, डिझेलवरील वाहनांची सेवा बंद करू नये, अशी विनंती वाहन चालकांनी केली. दुपारी मनपाच्या हिरवळीवर वाहन चालकांनी नारे निदर्शने केलीत. या आंदोलनात सुभाष घाटे, उमेश मेश्राम यांच्यासह ट्रॅव्हल्स कंपन्यांचे वाहन चालक सहभागी झाले होते.

◂(तभा वृत्तसेवा)

लोकार्पणप्रसंगी सुधीर मुनगंटीवार. सोबत डॉ. उपेंद्र कोठेकर, मोरेश्वर निस्ताने, संजय फांजे व मान्यवर

डॉ. उपेंद्र कोठेकर यांच्या ध्वनी चित्रफीतीचे लोकार्पण

◆ **नागपूर, २ नोव्हेंबर**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त 'आन तिरंगा शान तिरंगा' या देशभक्तीपर गीतांच्या ध्वनी चित्रफितीचे लोकार्पण वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते पार पडले. भाजपाचे विदर्भ संघटनमंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर यांनी शब्दबद्ध केलेले 'आन तिरंगा शान तिरंगा' या गीताला महाराष्ट्रातील गायक संगीतकार मोरेश्वर निस्ताने यांनी संगीतबद्ध केलेले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव प्रत्येक क्षेत्रामध्ये साजरा करण्याचे आवाहन केले आहे. त्याला प्रतिसाद देत विदर्भातील सुपरिचित कवी उपेंद्र कोठेकर यांनी हे गीत रचले आहे. भारत देशाचा इतिहास व संस्कृतीची जाण करून देणाऱ्या देशभक्तीचा जागर करणारे हे गीत स्फूर्तीदायी आहे. या गीताची चित्रफित व ध्वनिफीत तयार करण्याची संकल्पना मिलिंद भेंडे यांची असून गीताची चित्रफीत मनोज पिदडी यांनी तयार केली आहे.

गीताचे गायक मोरेश्वर निस्ताने, अंकिता टकले, मुकुल पांडे, पुरुषोत्तम ताईसकर असून साजेशे निवेदन श्वेता शेलगावकर यांनी केले आहे. अमृत प्रतिष्ठान नागपूरतर्फे निर्मित या चित्रफित व ध्वनिफितीच्या लोकार्पण सोहळ्याला आ. परिणय फुके, आमदार प्रवीण दटके, माजी आमदार गिरीश व्यास, गीतकार उपेंद्र कोठेकर, संगीतकार मोरेश्वर निस्ताने, मिलिंद भेंडे, संजय फांजे, राजीव हड्प, प्रदेश सचिव धर्मपाल मेश्राम, श्रीकांत देशपांडे, अरविंद शहापूरकर, संजय बंगाले, गिरीश देशमुख, मिलिंद कानडे, सुनील मित्रा, चंदन गोस्वामी व इतर मान्यवर उपस्थित होते.

◂(तभा वृत्तसेवा)

ऑनलाईन तभा वाचण्यासाठी
www.tarunbharat.net वर भेट द्या!

मा. धर्मादाय सह आयुक्त नागपूर यांचे कोर्टसमोर

जाहीर नोटीस

जा.क्र./JBC/७४९८/२२, दि. ३१/१०/२२
अर्ज क्र. ५३/२०१९
कलम ७०-अ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत
श्री देवस्थान शिव पंचायत, नळे-खंडाळा, ता. हिंगणघाट, जि. वर्धा ए-१२४ (वर्धा)
श्री. अनिल भाऊराव चौधरी
विरुद्ध
श्रीमती अरुणा सुभाष देशमुख व इतर

प्रती,
१) श्रीमती अरुणा सुभाष देशमुख, रा. वर्धा, जि. वर्धा, २) सौ. सुप्रिया किशोर मारशेट्टीवार, रा. नागपूर, ३) श्री. किशोर पुरुषोत्तम मारशेट्टीवार, रा. नागपूर. ४) श्री. सम्यक किशोर मारशेट्टीवार, रा. नागपूर, ५) श्री. मनीष अजाबराव गोलकर, रा. वर्धा

आपणास या नोटिसीद्वारे सूचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मा. धर्मादाय सह आयुक्त, नागपूर यांच्या कार्यालयात, महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम, १९५० च्या कलम ७०-अ अंतर्गत प्रकरण दाखल केले असून आपण सदर प्रकरणांत गैरअर्जदार क्र. १ ते ५ आहात. सदर प्रकरण दिनांक ०५/१२/२०२२ रोजी आपले लेखी म्हणणे सादर करण्यासाठी ठेवण्यात आलेले आहे. तरी आपण दिनांक ५/१२/२०२२ रोजी सकाळी ११ वाजता व्यक्तिश: वा अधिवक्तामार्फत धर्मादाय सह-आयुक्त, नागपूर यांच्या कार्यालयात उपस्थित राहणे गरजेचे आहे.

जर आपण **दिनांक ०५/१२/२०२२ रोजी** सदर प्रकरणात आपले म्हणणे व्यक्तिश: वा अधिवक्त्यामार्फत सादर करू शकले नाही तर सदर प्रकरणात आपले अनुपस्थितीत एकपक्षी आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

नागपूर, दिनांक : ३१/१०/२०२२

शिक्का

स्वा/- अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर

वसतिगृहांना इंटरनेट सुविधेसाठी प्रयत्न करणार

खा. भोलासिंह यांची माहिती

◆ **नागपूर, २ नोव्हेंबर**

अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या देशभरातील वसतिगृहांमध्ये इंटरनेट आणि वायफाय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री व खा. डॉ. भोलासिंह यांनी दिली.

पत्रपरिषदेला उपस्थित अशोक मेंढे, खा. डॉ. भोलासिंह, डॉ. मिलिंद माने

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनापासून ते २६ नोव्हेंबरपर्यंत एक अभियान राबविण्यात येत आहे. त्यात देशभरातील ७५ हजार वसतिगृहे आणि ७५०० दलित वस्त्यांमध्ये भेट देऊन तेथील समस्या आणि आवश्यकता जाणून घेण्यात येणार आहे. आता मध्यप्रदेश राज्य आटोपून नागपुरात पाहणी दौरा सुरू आहे, त्यानंतर महाराष्ट्रातील पुणे आणि सोलापूर या भागात पाहणी दौरा करण्यात येणार आहे. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षातील ६३ वर्षे काँग्रेस पक्षाचे सरकार होते. या काळात वसतिगृहांची स्थिती योग्य नव्हती, भोजन, निवास, अध्ययन कक्ष या शिवाय आधुनिक काळाची गरज लक्षात घेता, वसतिगृहातील विद्यार्थ्यांना नियमित गरजांशिवाय इंटरनेट, वाय-फाय असेच ई-लायब्ररी आदी सोयींची गरज असल्याची बाब पुढे आली आहे. यासोबतच केंद्र व राज्य शासनाने अनुसूचित जाती क्षेत्रातील युवकांसाठी, त्यांच्या शिक्षणासाठी तसेच रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आखलेल्या योजनांची माहिती वसतिगृहात तसेच दलित वस्त्यांमध्ये देण्यात येणार आहे. भाजपा केंद्रात सत्तास्थानी आल्यानंतर सामाजिक, राजकीय व आर्थिक आरक्षणासाठी केलेले प्रयत्न आणि त्याला आलेले यश यांची माहिती त्यांनी दिली. राजकीय क्षेत्रात आरक्षण असले तरी मंत्रिमंडळ आणि राज्यसभेत आरक्षण नसते पण तरीही भाजपाने केंद्रात १२ मंत्री, राज्यसभेत ४ खासदार तसेच पक्ष संघटनेत देखील भरपूर प्रतिनिधित्व दिले असल्याची माहिती दिली. पत्रपरिषदेला राजेश हाथीबेड, अशोक मेंढे, माजी आमदार डॉ. मिलिंद माने, सोहन चवरे, सतीश सिरसवान आदी उपस्थित होते.

◂(तभा वृत्तसेवा)

निवृत्ती वेतनधारकांना सूचना

नागपूर : मागील सहा महिन्यात शासन सेवेतून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतनसंबंधीचे निवृत्तीवेतन प्रदान आदेश (पीपीओ) महालेखाकार कार्यालयाकडून प्राप्त झाले आहे. परंतु कोषागारातून निवृत्तीवेतन प्रदान झालेले नाही, अशा सर्व सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचाऱ्यांना तसेच निवृत्तीवेतन विषयी तक्रारी, अडचणी असतील अशा निवृत्तीवेतनधारकांनी ४ नोव्हेंबरला दुपारी ४ वाजता वरिष्ठ कोषागार अधिकारी, नागपूर यांचे दालनात उपस्थित रहावे, असे वरिष्ठ कोषागार अधिकाऱ्यांनी कळविले आहे.

मा. धर्मादाय सह आयुक्त नागपूर यांचे कोर्टसमोर

जाहीर नोटीस

जा.क्र./JBC/७४९९/२२, दि. ३१/१०/२२
अर्ज क्र. ५३/२०१९
कलम ७०-अ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत
श्री देवस्थान शिव पंचायत, नळे-खंडाळा, ता. हिंगणघाट, जि. वर्धा ए-१२४ (वर्धा)
श्री. अनिल भाऊराव चौधरी
विरुद्ध
श्रीमती अरुणा सुभाष देशमुख व इतर

प्रती,
१) श्रीमती अरुणा सुभाष देशमुख, रा. वर्धा, जि. वर्धा, २) सौ. सुप्रिया किशोर मारशेट्टीवार, रा. नागपूर, ३) श्री. किशोर पुरुषोत्तम मारशेट्टीवार, रा. नागपूर. ४) श्री. सम्यक किशोर मारशेट्टीवार, रा. नागपूर, ५) श्री. मनीष अजाबराव गोलकर, रा. वर्धा

आपणास या नोटिसीद्वारे सूचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मा. धर्मादाय सह आयुक्त, नागपूर यांच्या कार्यालयात, महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम, १९५० च्या कलम ७०-अ अंतर्गत प्रकरण दाखल केले असून आपण सदर प्रकरणांत गैरअर्जदार क्र. १ ते ५ आहात. सदर प्रकरण दिनांक ०५/१२/२०२२ रोजी आपले लेखी म्हणणे सादर करण्यासाठी ठेवण्यात आलेले आहे. तरी आपण दिनांक ५/१२/२०२२ रोजी सकाळी ११ वाजता व्यक्तिश: वा अधिवक्तामार्फत धर्मादाय सह-आयुक्त, नागपूर यांच्या कार्यालयात उपस्थित राहणे गरजेचे आहे.

जर आपण **दिनांक ०५/१२/२०२२ रोजी** सदर प्रकरणात आपले म्हणणे व्यक्तिश: वा अधिवक्त्यामार्फत सादर करू शकले नाही तर सदर प्रकरणात आपले अनुपस्थितीत एकपक्षी आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

नागपूर, दिनांक : ३१/१०/२०२२

शिक्का

स्वा/- अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर

GOVERNMENT OF ARUNACHAL PRADESH
Draw Date : 01-11-2022 – Results

Time	Lottery	Numbers
4:00 PM	Rajshree Keno Saphire Weekly Lottery	03 05 06 09 18 19 23 25 29 31 33 39 41 42 46 49 51 57 69 78
5:00 PM	Rajshree Keno Mangal Weekly Lottery	03 06 15 17 20 22 24 26 28 29 51 54 56 57 64 67 68 73 75 78
6:00 PM	Rajshree Keno Chitra Weekly Lottery	02 05 18 22 26 27 31 37 41 43 45 51 57 60 61 62 66 67 76 80
7:00 PM	Rajshree Keno Dhara Weekly Lottery	05 06 09 15 23 28 32 35 40 41 43 47 49 51 52 53 66 70 72 80
7:45 PM	Rajshree Magic Lotto Tina Weekly Lottery	11 19 25 32 35
8:00 PM	Rajshree Keno Rani Weekly Lottery	03 06 12 18 25 31 33 47 48 49 52 56 57 60 61 66 71 75 76 77
8:30 PM	Rajshree Fast Lotto Mars Weekly Lottery	01 08 16 19 22
8:45 PM	Rajshree Tuesday Lotto	01 03 16 28 31 44

Check result with Official Gazette.
Issued by Department of State Lotteries, Govt of Arunachal Pradesh, Itanagar

मिझोरम राज्य लॉटरी
राजश्री डे बुध वीकली लॉटरी
Draw No.09 Draw Date : 02-11-2022 4:40 PM

1st Prize ₹ 1 LAKH — **48D-6236**

Consolation Prize ₹1000/- — जिंकले **6236** स्टॉ: बालाजी मार्केटींग, नागपूर (₹1000 x 5 बक्षिस) स्टॉ: अशोक बावा लॉटरी एजन्सी, पठाणकोट (₹1000 x 5 बक्षिस)

FOLLOWING NO'S ARE COMMON TO ALL SERIES

2nd Prize ₹9000/- — **9992**

3rd Prize ₹ 450/- (COMMON TO ALL SERIES)
0412 2663 2747 5740 5973 6075 8367 8839 9433 9832

4th Prize ₹ 250/- (COMMON TO ALL SERIES)
1741 3934 4193 5320 6038 6752 7099 7795 7841 8548

5th Prize ₹ 120/- (COMMON TO ALL SERIES)

0228	1092	2044	3346	3857	5009	6045	7004	8172	9214
0235	1184	2111	3397	4027	5310	6218	7065	8176	9217
0257	1336	2184	3420	4037	5314	6219	7103	8352	9220
0307	1391	2283	3430	4099	5517	6346	7385	8378	9337
0330	1421	2344	3437	4127	5663	6484	7479	8665	9439
0355	1553	2576	3685	4393	5692	6556	7483	8879	9635
0473	1814	2701	3702	4395	5817	6715	7701	8906	9683
0524	1866	2740	3732	4487	5831	6796	7764	9008	9722
0712	1918	2781	3747	4589	5879	6871	7906	9112	9800
0858	2003	3083	3777	4856	5887	6966	7959	9195	9925

Check result with Official Gazette. Issued by : Director, Mizoram State Lotteries.

ई-निविदा
जाहिरात क्र. ०१/२०२२-२३

वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचे कार्यालय
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, वाशीम

खोली क्र. ११३, जिल्हाधिकारी कार्यालय, काटा रोड, वाशीम ४४४५०५
दूरध्वनी क्र. (०७२५२)२३५७२२, ईमेल : sg_washim@rediffmail.com

जल जीवन मिशन २०२२-२३, योजनेंतर्गत जिल्ह्यातील ग्रामीण वाड्या/ वस्तांमध्ये कृत्रिम भूजल पुनर्भरणाच्या उपाययोजना राबविण्याचे तथा इतर अनुषंगिक कामांसाठी एका वर्षाकरिता दर निश्चित करणे व कंत्राटदारांची निवड करणे (Empanelment) साठी निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहे. निविदेविषयीची सविस्तर माहिती **https://www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१. ई-निविदा विक्री - दि. ०२/११/२०२२ रोजी सकाळी १६.०० वाजेपासून दि. १६/११/२०२२ रोजी दुपारी १७.०० वाजेपर्यंत
२. ई-निविदा पूर्व बैठक - दि. ०९/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता
३. ई-निविदा सादर करणे - दि. ०२/११/२०२२ रोजी सकाळी १६.०० वाजेपासून दि. १६/११/२०२२ रोजी दुपारी १७.०० वाजेपर्यंत
४. ई-निविदा उघडणे - दि. १८/११/२०२२ रोजी दुपारी १६.०० वाजता (शक्य झाल्यास)

जा.क्र.वभूर्वे/भूसविय/वाशीम/ई-निविदा/जाहिरात/५६५/२०२२
दि. ०१/११/२०२२

स्वाक्षरित/-
वरिष्ठ भूवैज्ञानिक
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा
वाशीम

Liberal Education Society's
HADAS PRIMARY & HIGH SCHOOL
(English Medium - State Board)
N.A.Road, Nagpur. Ph.: 0712-2998869

REQUIRES ENGLISH TEACHER

Qualified, Trained, Graduate Teacher
To Teach English To High School Classes

Qualification : B.A. (English Literature), B.Ed.
Salary commensurate with qualification & experience

Submit your C.V./Profile to School Office or E-mail it to
hadasprihigh@gmail.com on or before 10th November 2022

PROFIT/22

कोटक महिंद्रा बँक लि.

नोंदणीकृत कार्यालय: २७बीकेसी, सी २७, जी ब्लॉक, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (ई), मुंबई - ४०००५१ (महाराष्ट्र)
येथे शाखा: कोटक महिंद्रा बँक लि., २७बीकेसी, सहावा मजला, प्लॉट नं. सी-२७, जी ब्लॉक, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (ई), मुंबई - ४०००५१

अचल संपत्तीच्या विक्रीसाठी विक्रीची सूचना

सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदीसह वाचलेल्या आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन आणि एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

आम्ही सर्वसामान्य नागरिकांना आणि विशेषत: कर्जदार व जमानतदारांना ही **नोटीस** जारी करीत आहोत की, खाली वर्णन केलेली संपत्ती **कोटक महिंद्र बँक लिमिटेडकडे** (सुरक्षित धनको) तारण/ताबा असून, बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याने २८/०२/२०२२ रोजी या संपत्तीचा ताबा घेतला आहे. **मेसर्स महालक्ष्मी सिड्स अ‍ॅण्ड प्रोसेसिंग प्लांट (कर्जदार), श्रीमती सुशिला मदनलाल चितलांगे (जमानतदार/गहाणदार), श्रीमती संगीता संजयकुमार चितलांगे (जमानतदार), श्री. सौरभ संजयकुमार चितलांगे (जमानतदार)** यांच्याकडून २७.०२.२०२२ रोजी पर्यंतचे वसूल न झालेले **रु. ७,९४,३३,७२०/- (रु. सात कोटी चौऱ्यान्नव लाख तेहतीस हजार सातशे वीस फक्त)** सोबत, २८/०२/२०२२ पासून त्यावरील अतिरिक्त व्याज, शुल्क, अधिभार आणि वेळोवेळी सुरक्षित धनकोला आलेला खर्च **मेसर्स महालक्ष्मी सीड्स अ‍ॅण्ड प्रोसेसिंग प्लॅंटकडून** वसूल करण्यासाठी या संपत्तीचा **ई-लिलाव २३ नोव्हेंबर २०२२ रोजी 'आहे त्याच ठिकाणी', 'आहे त्याच रूपात' आणि 'आहे त्याच स्थितीत'**करण्यात येणार आहे. कर्जदार, जमानतदार आणि तारणदारांची सविस्तर माहिती खाली नमूद करण्यात आली आहे.

कर्जदाराचे नाव व पत्ता	विकल्या जाणाऱ्या मालमत्तेचे वर्णन	राखीव किंमत(रु.)	ईएमडी
१. मेसर्स महालक्ष्मी सिड्स अ‍ॅण्ड प्रोसिसिंग प्लांट (कर्जदार) **रा.** प्रतिनिधीद्वारे प्रोप्रायटर श्री.संजय मदनलाल चितलांगे राजुरकर कंम्पाऊंड, बॉम्बे लॉजजवळ, तिळक रोड, अकोला-४४४००१ **२. श्रीमती सुशिला मदनलाल चितलांगे** (जमानतदार/गहाणदार) **३. श्रीमती संगिता संजयकुमार चितलांगे** (जमानतदार) **सर्व राहणार क्र. २ व ३ :** साधुराम तोलाराम जीन, मोरना नदी, दगडी पूलजवळ, अकोला-४४४००१. **४. श्री. सौरभ संजयकुमार चितलांगे** (जमानतदार) **रा.** साधुराम तोलाराम जीन, मोरना नदी, दगडी पूलजवळ, अकोला-४४४००१. **येथे सुद्धा :** आयईएस ऑफिसर (संरक्षण मंत्रालय), ऑर्डीनन्स फॅक्टरी, अंबाझरी इस्टेट, अंबाझरी, नागपूर-४४००२३	मालमत्ता क्र. १ **श्रीमती सुशिला मदनलाल चितलांगे** यांच्या मालकीची, लेआऊट प्लॉट नं. ७, नझूल प्लॉट नं. ४२, नझूल शीट क्र. २६ बी व २७ ए, मौजे अकोला, ता. व जि. अकोला (परिसर ४७७५ चौ. फूट), अकोला महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या या मालमत्तेवरील प्रत्येक भाग व वस्तू **ज्यांची चर्तु:सीमा पुढीलप्रमाणे : पूर्वेकडे-** लेआऊटचा रस्ता, **पश्चिमेकडे-** लेआऊट प्लॉट नं. ३, **दक्षिणेकडे-** सर्व्हिस गल्ली, **उत्तरेकडे-** सरकारी रस्ता. सर्व फिक्स्चर आणि फिटिंग, इमारती आणि संरचना जमिनीशी जोडलेल्या किंवा संलग्न असलेल्या कोणत्याही गोष्टीला कायमस्वरूपी जोडलेले, वर्तमान आणि भविष्य दोन्ही आणि त्यासोबत जोडलेले सर्व एकत्र अधिकार.	३००००००० /- (रुपये तीन कोटी फक्त)	राखीव किंमतीच्या १०%

ई-लिलावाद्वारे स्थावर मालमत्तांच्या विक्रीच्या अटी आणि शर्ती:-
मालमत्तेची तपासणी: इच्छुक पक्ष २२.११.२०२२ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत मालमत्तांची तपासणी करू शकतात. ईएमडी सादर करण्याची शेवटची तारीख आणि वेळ २२.११.२०२२ संध्याकाळी ५ पर्यंत.

१. लिलाव विक्री केएमबीएलच्या मान्यताप्राप्त सेवा पुरवठादार मेसर्स ऑक्शन टायगर मार्फत **ऑनलाइन ई-लिलाव/बिडिंग** असेल, ज्याचे कार्यालय अहमदाबाद, गुजरात-३८०००६, हेल्प लाइन क्रमांक **श्री. प्रवीण कुमार फोन नंबर : ७९६१२००५१५ /९७२२७७८८२८** आहे, आणि **www.AuctionTiger.net** या वेबपोर्टलवर **sales@AuctionTiger.net** मेल आयडी हेल्प लाइन.
२. लिलाव विक्री **२३ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी १२:००** दरम्यान स्वयं-विस्तारांसह ५ (पाच) मिनिटांसाठी आयोजित केली जाईल, जर नियोजित बंद वेळेपूर्वी शेवटच्या पाच मिनिटांत बोली लावली गेली असेल.
३. सादर करावयाची बोली किंमत, अधिकृत अधिकाऱ्याने (एओ) निश्चित केलेल्या राखीव किमतीपेक्षा जास्त असेल आणि बोलीदार त्यांच्या ऑफरमध्ये आयएनआरच्या पटीत सुधारणा करेल. **१,००,०००/- (रुपये एक लाख हजार फक्त)**.
४. एओने सेट केलेल्या राखीव किमतीपेक्षा खाली मालमत्ता विकली जाणार नाही. राखीव किमतीच्या खाली उद्धृत केलेली बोली नाकारली जाईल आणि जमा केलेला ईएमडी जप्त केला जाईल.
५. यशस्वी बोली लावणाऱ्याने ई-लिलाव विक्री प्रक्रिया बंद झाल्यापासून २४ तासांच्या आत आधीच भरलेल्या खरेदीच्या रकमेच्या **२५ टक्के** (बयाणा रकमेसह) भरावे लागतील. खरेदी किमतीच्या **७५ टक्के** शिल्लक बँकेने विक्रीची पुष्टी केल्याच्या **१५ (पंधरा)** दिवसांच्या आत किंवा एओच्या विवेकबुद्धीनुसार लिखित स्वरूपात मान्य केल्यानुसार अशा विस्तारित कालावधीत भरणे आवश्यक आहे, असे न केल्यास बँक खरेदीदाराने आधीच भरलेली/जमा केलेली रक्कम जप्त करेल आणि एओला पुढील सर्वोच्च बोलीदाराला विक्रीची पुष्टी करण्याचा अधिकार आहे. .
६. बिडर्सना सूचित केले जाते की त्यांनी बिड फॉर्मसाठी, त्यांच्या बिड सबमिट करण्यापूर्वी आणि कार्यवाहीमध्ये भाग घेण्यापूर्वी विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्ती बघण्यासाठी या वेबसाइटच्या लिंकला भेट द्यावी.
७. बिड फक्त विहित नमुन्यात **ऑनलाइन/भौतिक** स्वरूपात सादर केल्या जातील. संबंधित तपशील योग्यरित्या भरलेले असतील. इतर कोणत्याही स्वरूपात सादर केलेल्या बोली/अपूर्ण बोली नाकारल्या जातील.
८. सर्व बिड फॉर्म खालील केवायसी कागदपत्रांच्या प्रतींसह असतील उदा., (i) पॅन कार्ड (ii) आधार कार्ड/पासपोर्ट (iii) वर्तमान पत्ता पुरावा (iv) वैध ई-मेल आयडी (v) संपर्क क्रमांक (मोबाइल/लँडलाईन), इ. वर नमूद केलेल्या ई-मेल आयडीवर नमूद केलेल्या कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या प्रती सादर कराव्या. सोबतच्या विक्री सूचनेमध्ये वर्णन केलेल्या मालमत्तेवर नमूद केल्यानुसार अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) ऑनलाईन बोली सबमिट करण्यापूर्वी डीडीद्वारे **'कोटक महिंद्रा बँक लिमिटेड'' मुंबई** येथे पेएबल असलेला जमा करावा लागेल.
९. इच्छुक बोलीदाराने बँकेला ईएमडी जमा केल्याचा पुरावा बँकेला मान्य असेल, त्या स्वरूपात सादर करावा.
१०. बोलीदारांनी वैध ई-मेल आयडी धारण केला पाहिजे. कारण सुरक्षित कर्जदार/सेवा प्रदात्याकडून सर्व संबंधित माहिती फक्त ई-मेलद्वारे कळविली जाऊ शकते.
११. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी ऑनलाईन/व्यक्तिगत प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी संभाव्य इच्छुक बोलीदार वर नमूद केलेल्या तपशिलावर सेवा प्रदात्याशी संपर्क साधू शकतात.
१२. तथापि, अधिकृत अधिकारी किंवा सुरक्षित कर्जदार किंवा सेवा प्रदाता कोणत्याही तांत्रिक त्रुटी/खंडित वीज पुरवठा आदींसाठी जबाबदार असणार नाहीत.
१३. ई-लिलावाची कार्यवाही बंद झाल्यापासून कामकाजाच्या **७** दिवसांच्या आत अयशस्वी बिडर्सचा **ईएमडी** परत केला जाईल.
१४. विक्री बँकेच्या पुष्टीकरणाच्या अधीन आहे. कर्जदार/जामीनदारांनी ई-लिलावाच्या नियुक्त तारखेपूर्वी आणि वेळेपूर्वी सुरक्षित कर्जदाराची संपूर्ण रक्कम भरल्यास कोणतीही विक्री केली जाणार नाही.
१५. एओच्या उत्तम ज्ञान आणि माहितीनुसार, उपरोक्त मालमत्तेवर इतर कोणतेही बंधने अस्तित्वात नाहीत, तथापि संभाव्य निविदाकारांना सूचित केले जाते की, त्यांनी स्वतःचे योग्य परिश्रम करावे आणि शीर्षक/भार आदी संदर्भात स्वतंत्र चौकशी करावी. उपरोक्त गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या संदर्भात कोणतेही शुल्क, धारणाधिकार, बोझा, मालमत्ता कर किंवा सरकारच्या कोणत्याही देयांसाठी एओ जबाबदार राहणार नाही आणि उपरोक्त गहाण मालमत्तेच्या संदर्भात कुणीही. मालमत्तेची विक्री सध्याच्या आणि भविष्यातील सर्व भारांसह केली जात आहे, मग ती सुरक्षित कर्जदाराला ज्ञात असो वा नसो.
१६. एओला कोणतीही निविदा/निविदा (एक तर मालमत्तेसाठी) नाकारण्याचा किंवा कोणतेही कारण न देता ई-लिलाव रद्द करण्याचा अधिकार आहे.
१७. विक्रीच्या अटींचे पालन केल्यावर एओ खरेदीदाराच्या नावे विक्रीचे प्रमाणपत्र जारी करतील. मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, वाहतूक, व्हॅट, टीडीएस, जीएसटी इत्यादींशी संबंधित सर्व खर्च खरेदीदाराकडून उचलले जातील.
१८. सदर विक्री सरफेसी कायदा/नियम, २००२ आणि वर नमूद केलेल्या अटींच्या अधीन आहे.
१९. मालमत्तेच्या तपासणीसह लिलावाच्या कोणत्याही अधिक माहितीसाठी अभिप्रेत निविदाकार **श्री. दुष्यंतसिंह झाला यांच्याशी फोन नंबर ९०९९०९१२६२ किंवा श्री. मयूर पगारे यांच्याशी फोन नंबर ९७०२६४३०५३ यावर सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ५** या दरम्यान संपर्क साधू शकतात.

दिनांक : ०२.११.२०२२
ठिकाण : अकोला

स्वाक्षरी
अधिकृत अधिकारी, कोटक महिंद्रा बँक

आजचा दिवस

गुरुवार, ३ नोव्हेंबर २०२२

शके १९४४, विक्रम संवत् २०७९, शुभकृत नाम संवत्सर, दक्षिणायन, सौर हेमंत ऋतु, कार्तिक (शुक्ल पक्ष); भारतीय सौर कार्तिक-१२; हिजरी १४४४: रबिलारवर (४)- ७.

पंचांग : तिथी- दशमी (१९.३० पर्यंत); नक्षत्र- शततारका (२४.४८ पर्यंत); योग- वृद्धि (७.४८ पर्यंत) ध्रुव (२९.२३ पर्यंत); करण- तैतिल (८.१७ पर्यंत) गरज (१९.३० पर्यंत); नागपूर सूर्योदय- ६.१८, सूर्यास्त- १७.३५, दिनमान-११.१७; चंद्र राशी- कुंभ; दिवस- शुभ.

दिनविशेष : पंचक.

ग्रहस्थिती : रवि- तूळ, मंगळ- मिथुन (वक्री), बुध- तूळ (मार्गी/अस्त), गुरु- मीन (वक्री), शुक्र- तूळ (अस्त), शनि- मकर, राहू- मेष, केतु- तूळ, हर्षल- मेष (वक्री), नेपच्यून- कुंभ (वक्री), प्लुटो- मकर.

राशिभविष्य

मेष- हितशत्रूंचा त्रास वाढू शकतो.
वृषभ- व्यावसायिक यश मिळेल.
मिथुन- शत्रुंकडे दुर्लक्ष करू नको.
कर्क- जोडीदाराचे वर्चस्व स्वीकारा.
सिंह- व्यसनांच्या आहारी जाऊ नका.
कन्या- नव्या कामात बस्तान बसेल.
तूळ- मुलांकडे लक्ष देणे जरूरी.
वृश्चिक- सकारात्मक भूमिका हवी.
धनु- निर्णय ठामपणे घ्यावेत.
मकर- वरिष्ठांच्या मदतीने लाभ.
कुंभ- हाती घेतलेली कामे पूर्ण करा.
मीन- सामोपचाराने प्रश्न सोडवा.

शब्दकोडे-७५६१



○ *आडवे शब्द:-* 1) शीखांचा एक पंथ, 3) समर्थन, 6) वेणीत खोचलेली पुष्प-माला, 7) कुवत, 8) प्रयाग, 10) मेघवर्षाव, 11) समाप्त, 13) ऐश्वर्य, 14) जळत राहणे *(दिवा)*, 16) असूया, 17) गोपजा, 18) एक लंबकर्ण, 19) अतिरेक, 21) घाणा, 23) द्वीप, 24) हत्ती, 26) एक फूलझाड, 27) खेप, 28) जमिनीला समांतर, 29) सुमारे.

○ *उभे शब्द:-* 2) शक्तिमान, 3) अवघड, 4) बळजबरीचा विवाह, 5) म्हातारपण, 6) घोष, 8) उद्ध्वस्त, 9) कष्टणे, 12) रामाचा जनक, 15) वाढणे, 16) दुराग्रही, 18) विनापाश, 20) अनेक, 22) कारण, 23) एकत्रिकरण, 25) तारुण्य, 26) ताबा, 27) तान्हुला, 28) बालंट.

(उत्तर: पुढील अंकात)

मागील कोड्याचे उत्तर



सू-डोकू-४१५१

९					८	३	१	
२					४	८		
८	२				६			
			३				७	५
		५	९					४
	१	७	५					३

MANGAL SENCHA, JAGRUTHI DAUR, BANGALORE-39

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

सू-डोकू - ४१५०

३	९	२	४	७	६	५	८	१
८	६	४	५	३	१	९	२	७
७	५	१	९	८	२	६	४	३
६	१	३	७	४	८	२	९	५
५	८	९	१	२	३	७	६	४
२	४	७	६	५	९	१	३	८
१	३	८	२	९	७	४	५	६
९	७	५	३	६	४	८	१	२
४	२	६	८	१	५	३	७	९

श्री नरकेसरी प्रकाशन लि.च्या वतीने मुद्रक, प्रकाशक **गजानन श्रीधर निमदेव** यांनी हे पत्र दिव्य मराठी प्रिंटिंग प्रेस बोरगाव मंजू एनएच-६, अकोला येथे छापून तरुण भारत आवृत्ती कार्यालय, म्हाडा बिल्डिंग, पत्रकार कॉलनी, अकोला येथे प्रकाशित केले. संस्थापक संपादक - **ग. त्र्यं. माडखोलकर,** मुख्य संपादक- **गजानन श्रीधर निमदेव***, दूरध्वनी (०७२४-२४१४२७७) **E-mail :** tbnagpur@gmail.com, tbakola@gmail.com पं. क्र. अकोला विभाग/२४४/२०२१-२०२३, आरएनआय नं. एमएएचएमएआर/२०१५/७४३३६ (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर)